पाहिजेत
दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३२९ ■ मंगळवार, दि. १ एप्रिल २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -329 ■ Tuesday, 1 April 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## बीड कारागृहात राडा, चार आरोपींना अन्यत्र हलविले

**बीड :** संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले यांना बीडच्या तुरुंगात मारहाण झाल्याच्या वृत्तानंतर खळबळ उडाली आहे. सध्या बीडच्या कारागृहात असलेल्या वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले यांना महादेव गिते आणि अक्षय आठवले यांनी मारहाण केल्याचे बोलले जाते. परंतु, तुरूंग प्रशासनाने हा दावा फेटाळला आहे. या घटनेनंतर महादेव गित्तेसह चार आरोपींना छत्रपती संभाजीनगरच्या हर्सुल कारागृहात हलवण्यात आले आहे.

प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, न्यायालयीन कोठडीत असलेले कैदी सुदिप सोनवणे व राजेश अशोक वाघमोडे हे दोघे जिथे त्यांना कारागृहात ठेवण्यात आले होते, तेथील मोकळ्या जागेत आपल्या नातेवाईकांना फोन करण्यासाठी आले होते. याचदरम्यान एकमेकांकडे बघून त्या दोघांमध्ये शाब्दीक बाचाबाची झाली. त्यानंतर दोघांमध्ये झटापट देखील झाली. कर्तव्यावर असलेले पोलीस त्यांचा वाद सोडवत असतानाच तिथे इतर देखील काही कैदी जमा झाले. त्यामुळे गोंधळ वाढला, इतरही कैदी शिवीगाळ करू लागले. त्यावेळी तिथे उपस्थित असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली व कैद्यांना पुन्हा आपआपल्या बॅरॅकमध्ये पाठवले.

या घटनेशी संबंधित आरोपींवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी बीड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. मात्र, या घटनेनंतर वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले यांना मारहाण झाल्याची बातमी प्रसारमाध्यमांमध्ये सुरू आहे. मात्र वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले यांना कोणतीही मारहाण झालेली नाही, असे तुरुंग प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## 'बिश्नोई गँगला सांगून मला संपवण्याचा कट रचला; धस यांचा खळबळजनक दावा

बीड: भाजपचे आमदार सुरेश धस यांनी, त्यांना मारण्यासाठी बिश्नोई गँगच्या काही सदस्यांना विमानाने मुंबईत आणण्यात आले होते असा खळबळजनक दावा केला आहे. विरोधकांवर आरोप करत धस म्हणाले की, 'बिश्नोई समाजात हरणाला देवाचा दर्जा दिला जातो. आणि सुरेश धस हरणाचं मांस खातो अशी राळ उठवत मला त्यांच्या नजरेत व्हिलन बनवण्याचं काम केलं गेलं. इतके दिवस बोललो नाही पण ही बाब मी मुख्यमंत्र्यांना सांगणार असल्याचेही धस म्हणाले.

गेल्या काही महिन्यांमध्ये सुरेश धसहे नाव संपूर्ण महाराष्ट्राला चांगलेच माहित झाले आहे. ते, बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात आरोपींना कठोरात कठोर शिक्षा मिळावी यासाठी आग्रही असल्याचे पहायला मिळाले. दुसऱ्याला आका म्हणून संबोधणारे धस, त्यांच्याच अत्यंत जवळचा कार्यकर्ता सतीश भोसले ऊर्फ खोक्याच्या कारनाम्यांमुळे स्वतःच एका गुंडाचे आका आहेत की काय अशा चर्चांनादेखील उधाण आले होते. त्याच सुरेश धसांनी, खोक्याने हरणाच्या मांसासाठी केलेली शिकारी यांवरुन होत असलेल्या आरोपांना प्रत्युत्तर देताना एक धक्कादायक खुलासा केला आहे.

खोक्याच्या प्रकरणात मला जाणूनबुजून अडकवण्याचा मोठा प्रयत्न करण्यात आला. मी हरणांचं मांस खातो, म्हणून खोक्याने शिकार केलेल्या हरणांचं मांस तो मला पुरवत होता. अशी राळ उठवली गेली. बिश्नोई समाजात हरणाला देवाचा दर्जा दिला जातो. आणि या सगळ्या प्रकरणात मला व्हिलन बनवलं गेलं. कारण बिश्नोई गँगच्या हातून माझा खून घडवून आणायचा होता. १६ वर्षे मी माळकरी राहिलेला माणूस आहे. माझ्या आयुष्यात हरणाच्या मांसापर्यंत मी कधीच गेलो नाही. मी पशू-पक्ष्यांवर प्रेम करणारा माणूस आहे. मला काय माहिती खोक्याच्या घरात काय सापडलं, असं म्हणत धस यांनी विरोधकांचा खोक्यानं मांस पुरवल्याचा दावा फ ेटाळून लावला.

पुढे धस विरोधकांना उद्देशून म्हणाले की, बिश्नोई समाजाची तीन ते चार लोकं विमानाची तिकीटं फाडून जर मुंबईत आणत असाल, आणि त्यांना जर खोक्याने मला हरणाचे मांस पुरवल्याविषयी सांगत असाल तर, मला जीवातून उठवण्यापर्यंत तुम्ही गेलातच ना. म्हणजे लॉरेन्स बिश्नोईनं माझा खून केला पाहिजे. इतक्या खालच्या थराला जर तुम्ही जात असाल तर तुमच्याबरोबर मैत्री काय कामयची. इतके दिवस आपण हे कधी बोललो नव्हतो. पण हे राज्याच्या मुख्यमंत्र्यांना आपण सांगणार असल्याचेही सुरेश धस म्हणाले.

## १६ हजार कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाला मंजुरी

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पात 'म्हाडा'च्या मुंबई, पुणे, कोकण, नाशिक, अम रावती, छत्रपती संभाजीनगर, नागपूर या प्रादेशिक मंडळांमार्फत एकूण १९ हजार ४९७सदनिकांचे बांधकाम करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून त्यासाठी अर्थसंकल्पात १६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. म्हाडाचा सन २०२४-२५ चा सुधारित व सन २०२५-२०२६ चा अर्थसंकल्प प्राधिकरणास नुकताच सादर करण्यात आला.

प्राधिकरणाच्या सन २०२५-२०२६ च्या १५९५६.९२ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाला व सन २०२४-२५ च्या १०९०१.०७ कोटी रुपयांच्या सुधारित अर्थसंकल्पाला महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची नुकतीच मंजुरी मिळाली आहे. म्हाडाच्या मुंबई मंडळाअंतर्गत येत्या आर्थिक वर्षात ५१९९ सदनिकांची उभारणी करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात ५७४९.४९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कोकण मंडळाअंतर्गत ९९०२ सदनिकांची उभारणी करण्याचे उद्दिष्ट असून सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात त्यासाठी १४०८.८५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पुणे मंडळाअंतर्गत १८३६ सदनिकांचे बांधकाम करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात ५८५.९७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच नागपूर मंडळाअंतर्गत ६९२ सदनिकांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात १००९.३३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर मंडळाअंतर्गत १६०८ सदनिकांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी २३१.१० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. नाशिक मंडळाअंतर्गत ९१ सदनिका बांधण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात ८६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अमरावती मंडळाअंतर्गत १६९ सदनिकांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी अर्थसंकल्पात ६५.९६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मुंबई मंडळातर्फे अर्थसंकल्पात वरळी, नायगाव, परळ बीडीडी चाळींच्या पुनर्विकास योजनेसाठी २८०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**मुंबईत येत्या आर्थिक वर्षात ५ हजार सदनिकांचे उद्दिष्ट**

जोगेश्वरी पूर्व येथील पीएमजीपी कॉलनी पुनर्विकास प्रकल्पासाठी ३५० कोटी रुपये, वांद्रे पश्चिम येथील परिध खाडी पुनर्विकास प्रकल्पासाठी २०५ कोटी रुपये, गोरेगाव सिद्धार्थनगर येथे सदनिका उभारणीसाठी ५७३ कोटी रुपये, परळ येथील जिजामाता नगर येथील भूखंडावर मुले व मुलींच्या निवासासाठी वसतिगृह उभारणीसाठी २० कोटी रुपये, गिरणी कामगारांच्या घरासाठी ५७.५० कोटी रुपये, बोरिवली सर्वे क्र. १६० वरील योजनेसाठी २०० कोटी रुपये, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामधील पुनर्वसन प्रकल्पासाठी २०० कोटी रुपये, पहाडी गोरेगाव प्रकल्पासाठी १७७.७९ कोटी रुपये, मालवणी झोपडपट्टी सुधार प्रकल्पासाठी ५० कोटी रुपये, मागाठाणे बोरिवली योजनेसाठी ८५ कोटी रुपये, एक्सर बोरिवली तटरक्षक दल योजनेसाठी ३० कोटी रुपये, गोरेगाव सिद्धार्थनगर (पत्राचाळ) पुनर्विकास प्रकल्पासाठी २० कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे.

## सावधान! घिबलीच्या नादात संकटात सापडाल

मुंबई : सोशल मीडियाचे (Social Media) जाळे जगभरात पसरत असून विविध ॲपचे लोकांना वेड लागत आहे. सोशल मीडियावर सुरु असणाऱ्या प्रत्येक गोष्टींकडे माणूस सहज ओढला जातो. विविध फोटो आणि व्हिडिओच्या चलत्या ट्रेंडमध्ये आता 'घिबली' (Ghibli Style Image) नावाच्या वादळाने तुफान घातले आहे. गेल्या काही दिवसांत चॅट जीपीटीद्वारे (Chat GPT) तयार केले जाणाऱ्या घिबली आर्ट माणसांच्या फोटोला कार्टूनचे रुप दिले जात आहे. अगदी लहानग्यांपासून वयोवृद्ध तसेच सर्व अभिनेते आणि राजकारणातील लोकं देखील या ट्रेंडचा वापर करत आहेत. अनेकजण स्वतःचे, मित्र-मैत्रिणींचे, कुटुंबाचे फोटो वापरून आकर्षक इमेजेस तयार करत आहेत आणि सोशल मीडियावर शेअर करत आहेत. इतकेच नव्हे तर त्या फोटोंवर लाईक्स आणि कमेंट्सचा मोठा वर्षाव देखील होत आहे. पण या मनोरंजनाच्या मागे एक मोठा धोका लपलेला आहे का? तुमचा फोटो एआयसोबत (AI) शेअर करणे म्हणजे नकळत तुमची ओळख धोक्यात घालण्यासारखे आहे का? असे अनेक प्रश्न नागरिकांच्या मनाला भेडसावत आहेत. त्यामुळे घिबलीचा धोका आहे का, जाणून घ्या.

घिबली किंवा इतर कोणतीही एआय इमेज तयार करण्यासाठी आपल्याला आपला फोटो एआय प्रणालीसोबत शेअर करावा लागतो. आपण नकळतपणे आपली अत्यंत वैयक्तिक बायोमेट्रिक माहिती म्हणजेच आपल्या चेहऱ्याची ओळख एआय कंपन्यांना देत असतो. ही गोष्ट पासवर्ड किंवा क्रेडिट कार्ड नंबर चोरीला जाण्यापेक्षाही जास्त धोकादायक मानली जाते. एकदा का तुमच्या चेहऱ्याचा डेटा चोरीला गेला किंवा त्याचा गैरवापर झाला, तर त्याचे परिणाम गंभीर असू शकतात.

चेहऱ्याची ओळख पटवणाऱ्या तंत्रज्ञानाची (Facial Recognition Technology - FRT) बाजारपेठ वेगाने वाढत आहे. स्टॅटिस्टाच्या (Statista) अहवालानुसार, २०२५ मध्ये ही बाजारपेठ ५.७३ अब्ज डॉलर्सची असेल आणि २०२१ पर्यंत ती १४.५५ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे (16.79% CAGR). मेटा ) आणि गूगल सारख्या मोठ्या कंपन्यांवरही युजर्सच्या फोटोंचा वापर त्यांच्या एआय मॉडेल्सना प्रशिक्षित करण्यासाठी केल्याचे आरोप झाले आहेत. पिमआईज सारख्या वेबसाइट्समुळे तर कोणीही फक्त फोटो वापरून एखाद्या व्यक्तीला ऑनलाइन शोधू शकते, ज्यामुळे ओळख चोरीचा धोका आणखी वाढतो.

हे धोके टाळण्यासाठी सावधगिरी बाळगणे हा एकमेव मार्ग आहे. कोणत्याही एआय टूलचा वापर करण्यापूर्वी विचार करा की तुमचा फोटो किंवा डेटा कसा वापरला जाईल. सोशल मीडियावर कमी रिझोल्यूशनचे फोटो अपलोड करा. शक्य असल्यास फेस अनलॉकऐवजी पिन किंवा पासवर्ड वापरा.

गोपनीयतेचा भंग : युजर्सचे फोटो त्यांच्या परवानगीशिवाय विविध कारणांसाठी वापरले जाऊ शकतात.

ओळख चोरी : फोटोंचा गैरवापर करून एखाद्याची ओळख चोरली जाऊ शकते.

डेटा सिक्युरिटी : युजर्सची माहिती सुरक्षित राहू शकत नाही आणि हॅकिंगला बळी पडू शकते.

चुकीचा वापर : फोटोंचा चुकीचा वापर केला जाऊ शकतो, जसे की फेक प्रोफाइल तयार करणे.

कायदेशीर मुद्दे : युजर्सच्या फोटोंचा अनधिकृत वापर कायदेशीर समस्या निमर्ाण करू शकतो. ही जोखीम लक्षात घेऊन युजर्सनी आपले फोटो शेअर करण्यापूर्वी सावधगिरी बाळगली पाहिजे.

## पंढरपूरची 'वारी' आता चित्रपटरूपाने येणार वारकऱ्यांच्या भेटीला!

मुंबई : वर्षभराची ऊर्जा देणारा आनंदसोहळा म्हणून पंढरीच्या वारीकडे पाहिलं जातं. 'प्रवास ओढीचा, विठ्ठलाच्या गोडीचा' अशी भावना असणारी वारी प्रत्येकाला ओळखीची असली तरी दरवेळी तिचा नवा अनुभव आयुष्य समृद्ध करणारा असतो. पंढरपूरी विठूरायाला भेटण्याची तळमळ असतेच, पण त्यापेक्षाही पायी वारीतून वाटचाल करण्याचा आनंद आभाळाएवढा असतो. हीच अनुभूती करुन देणारा 'वारी' प्रवास चित्रपटरुपाने सर्वांच्या भेटीस येणार आहे.

महाराष्ट्राचे सांस्कृतिक अधिष्ठान असलेली ही पंढरपूरची 'वारी' मराठी चित्रपट सादर करणार आहे. वारकरी भक्तांना 'आतून' श्रीमंत करणारी वारीची परंपरा आणि मराठी मातीचं सांस्कृतिक वैभव 'वारी' चित्रपटातून मांडण्यात येणार आहे. नुकताच या चित्रपटाचा दिमाखदार मुहूर्त संपन्न झाला. आमदार किसन कथोरे यांनी विधीवत पूजा करून या चित्रपटाला शुभाशिर्वाद दिले. अभिनेता प्रसाद ओक, वैभव मांगले, गणेश यादव, प्रणव रावराणे या दिग्गज कलाकारांच्या साथीने 'वारी' चा हा प्रवास आपल्याला घडणार आहे. वारीत अध्यात्म आहे, मॅनेजमेंट आहे, लोककला, संगीत, संस्कृती, मानवी भाव भावनांचा संगम सर्वच बघायला मिळतं.

## 'मराठी गया तेल लगाने, तुमः'; मुंबईत एल अँड टीच्या सुरक्षा रक्षकाची मुजोरी, मनसेने 'असा' शिकवला धडा

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पवईतील 'एल अँड टी' कंपनीच्या सुरक्षा रक्षकाने 'मराठी गया तेल लगाने!' असे म्हणत मराठी भाषेचा अपमान केल्याचा प्रकार मुंबईतल्या पवईमध्ये घडला आहे. या घटनेनंतर संतापलेल्या मनसैनिकांनी अपमान केला. या वक्तव्याने संतप्त झालेल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महाराष्ट्र सैनिकांनी त्याला चांगलाच धडा शिकवत कानाखाली लगावत आणि खडे बोल सुनवतकंपनीच्या सुरक्षा रक्षकाला माफी मागायला लावली. मराठी भाषेचा अपमान करणाऱ्या या सुरक्षा रक्षकाला मनसेने त्यांच्या स्टाईलने धडा शिकवला.

**व्हिडीओत नेमका काय संवाद?**

मनसैनिक : काय बोलतोय तू?

सुरक्षा रक्षक: जो पुछा वो बताने के लिये

मनसैनिक : तू मराठीत बोल, मराठीत का बोलत नाहीये?

सुरक्षा रक्षक : मराठी मेरे को आता नहीं. मै क्यूँ बोलू

मनसैनिक : तुला मराठी बोलावं लागेल

सुरक्षा रक्षक : मराठी, मराठी मुझे आती नहीं.

मनसैनिक : बोल माझ्याशी मराठीत, मला हिंदी येत नाही, तू मराठीतच बोल

सुरक्षा रक्षक : मेरे को मराठी आता नहीं.

मनसैनिक : तो सिख फिर, तू शिक मराठी, मला सांगू नको.

सुरक्षा रक्षक : क्यूँ जरुरी है क्या?

मनसैनिक : क्यूँ जरुरी मतलब? मराठी जरुरी नाही?

सुरक्षा रक्षक : मराठी गया तेल लगाने, मेर को मत बताओ तुम.

मनसैनिक : मराठी गेलं तेल लावायला? तुला दाखवतो मी मराठीची औकाद काय असते. मराठी गेलं तेल लावायला म्हणालास ना?

सुरक्षा रक्षक : ये मेरेको गाली दे रहा है..

दुसरा सुरक्षा रक्षक : काय झालं? जाऊ द्या जाऊद्या..

**यानंतर मनसेने नेमकं काय केलं?**

मराठी भाषेबाबत मुजोरी दाखवणाऱ्या सुरक्षा रक्षकाला मनसैनिकांनी कानशिलात लगावली आणि मराठी गया तेल लगाने म्हणणाऱ्या सुरक्षा रक्षकाला चांगला धडा ( शिकवला. यानंतर मनसैनिकांनी या सुरक्षा रक्षकाला घेराव घातला.

तू किती वर्षे मुंबईत राहतो आहे? सुरक्षा रक्षक म्हणाला चार वर्षे. यानंतर मनसैनिकांनी त्याच्याकडून माफी मागून घेतली ती अशी. ङ्गमी मराठीचा अपमान केला त्याबद्दल राज ठाकरेंची आणि संपूर्ण महाराष्ट्राची माफी मागतो, मराठी माणसांचीही माफी मागतो. यापुढे मराठी शिकण्याचा मी प्रयत्न करेन. असं म्हणत मुजोरी दाखवणाऱ्या सुरक्षा रक्षकाने माफी मागितली.

### सुपरवायझरलाही मनसेने दिला इशारा

यानंतर मनसैनिकांनी या सुरक्षा रक्षकाला कामावर ठेवणाऱ्या सुपरवायझरलाही फैलावर घेतलं. याला कामावर ठेवलं आहे चार वर्षांपासून आणि त्याला मराठी कशी येत नाही? जो माणूस मराठी बोलायला येईल त्याच्याशी मराठीत बोला. मराठी गेली तेल लावत वगैरे ऐकून घेणार नाही. ज्याला मराठी येत नसेल त्याने ती शिकावी. ज्यांना समजतं आहे त्यांनी मराठी माणसांशी संवाद साधावा पण मराठी गया तेल लगाने हे महाराष्ट्रात ऐकून घेणार नाही असा सज्जड दम मनसैनिकांनी त्या सुपरवायझरलाही भरला.

# अधिवेशनाचा शेवट व गोंधळाची शक्यता

पुढे देशाचे राजकारण केवळ आणि केवळ विकासाच्या मुद्द्यावर लढले जाईल, असा दावा केला जात होता. साधारणतः दहा वर्षांपूर्वीचा काळ आठवला की ही विधाने सहज आपल्या लक्षात येतील. मात्र, सध्याचे राजकारण विकासापासून लांब गेले की काय? अशी शंका येऊ लागली आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा भाग अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. येत्या शुक्रवारचा दिवस बजेटचा सेशनचा शेवटचा दिवस होय. या आठवड्यात संसदेचे कामकाज मंगळवार ते शुक्रवार असे चार दिवस चालणार आहे. मात्र, या आठवड्यात संसदेत जोरदार गोंधळ होण्याची शक्यता विविध स्तरातील लोकांकडून व्यक्त केली जात आहे. अमेरिकेने लादलेले टेरिफ दोन एप्रिलपासून लागू होणार आहे. शिवाय, सरकार या आठवड्यात एक महत्त्वपूर्ण विधेयक सभागृहाच्या पटलावर मांडणार असल्याचे समजते. या दोन्ही गोष्टीमुळे शेवटच्या आठवड्यातील अधिवेशन गाजण्याची शक्यता आहे.

सध्या देशाला आणि या देशवासीयांना बेरोजगारी, गरिबी, गुन्हेगारी, लैंगिक असमानता, वैद्यकीय आणि मूलभूत सुविधा यासारख्या समस्या भेडसावत असताना त्यावर उपाययोजना करण्याचे जसे प्रयत्न व्हायला पाहिजे तसे होताना दिसत नाहीत. याउलट इतिहासातील जुने मुद्दे उकरून काढण्यात पुढारी मंडळींना जास्त रस असल्याचे दिसून येत आहे. यात औरंगजेबाच्या कबरीपासन महाराणा

सांगा यांच्या नावावरून वाद उकरून काढणे सामील आहे. समाजवादी पक्षाचे खासदार रामजी लाल सुमन यांनी राज्यसभेत बोलताना भाजपचा डीएनए बाबरचा डीएनए असल्याचे विधान केले. एवढेच नव्हे तर, बाबरला भारतात कुणी आणले? असा प्रश्न उपस्थित करीत इब्राहिम लोदीला हरवण्यासाठी राणा सांगा यांनीच बाबरला आणले होते, असे त्यांनी सांगितले. रामजीलाल सुमन यांच्या विधानानंतर गोंधळ झाला नसता तरच नवल. केंद्रीय पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी लगेच त्यावर आक्षेप घेत विरोध नोंदविला. महाराणा सांगा आणि बाबर यांची आपसात तुलना होऊ शकत नाही. दोघांमध्ये खूप मोठा फरक आहे. महाराणा सांगा यांनी देशवासीयांच्या मनात  वातंत्र्याची भावना जागृत केली होती. भारताला गुलामगिरीतून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले होते आणि भारताची संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न केले होते. मात्र, काही क्षुद्र आणि संकुचित लोकांना हे पटणार नाही. विकासाची चर्चा सुरू असताना अशी चर्चा व्हायला नको असेही शेखावत म्हणाले. परंतु, राजकारण्यांनी आपली मतपेढी मजबूत करण्यासाठी असे वाद निर्माण करण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही देशात ऐतिहासिक मुद्द्यांवरून फूट पाडण्याचे प्रयत्न झाले आहेत. पद्मावत या चित्रपटावरूनही बराच वाद निर्माण झाला होता. चित्रपटात ऐतिहासिक तथ्यांना विकृत पध्दतीने सादर करण्यात आले असा आरोप तेव्हा राजपूत समुदायाने केला होता. यामुळे मोठा वाद निर्माण झाला होता आणि गोंधळही करण्यात आला होता. कर्नाटकात टिपू सुलतानच्या जयंतीचा उत्सव साजरा होत असतानाही असाच वाद निर्माण झाला होता. एवढेच नव्हे तर यावेळी कलम १४४ लागू करण्यात आले होते आणि निदर्शने करणाऱ्या शेकडो लोकांना ताब्यात घेण्यात आले होते. भाजप आणि काही हिंदू संघटनांनी टिपू सुलतानची जयंती साजरी करण्याचा कार्यक्रम आणि त्यांचा गौरव करण्याची योजना थांबवण्याची मागणी केली होती. भाजपच्या दृष्टीने टिपू सुलतान हा धार्मिकदृष्ट्या कट्टर आणि हिंदूविरोधी शासक होता. उत्तर प्रदेशातील संभल जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून धार्मिक वाद निर्माण झाला आहे. याचा फायदा प्रत्येकाने आपआपल्यापरीने घेतला. या संवेदनशील मुद्द्यावरून झालेल्या हिंसाचारात पाच जणांचा मृत्यू झाला. यानंतर, देशाच्या इतर भागातही असेच वाद निर्माण झाले. महाराष्ट्रातील औरंगजेबाच्या

थडग्यावरून वाद निर्माण झाला आहे. या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधी पक्षांत जोरदार कलगीतुरा रंगला आहे. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झाडल्या जात आहेत. याच कारणावरून नागपूरमध्ये हिंसाचार झाला. कर्फ्यूमुळे सामान्य नागरिकांना खूप त्रास सहन करावा लागला. देशातील कामगार, गरीब आणि कामगार वर्ग अनेकदा अशा वादांना बळी पडतात, हे तेवढेच खरे आहे. या आठवड्यात संसदेत गोंधळ होण्याची शक्यता आहे. अमेरिकेने लादलेले टेरिफ आणि सरकारकडून आणले जाणारे अज्ञात विधेयक यामुळे वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने वक्फ विधेयकाला मंजुरी दिली आहे. अशात हे विधेयक सभागृहाच्या पटलावर शेवटच्या टप्प्यात ठेवले जाऊ शकते  अशी चर्चा आहे. मात्र, पाच राज्यांत विधानसभेची निवडणूक होणार असताना सत्ताधारी पक्ष वक्फ विधेयक आणून अल्पसंख्याक मतदारांना नाराज करण्याचा प्रयत्न करणार काय? असा प्रश्न विचारला जात आहे. काही खासदारांच्यामते विधानसभेच्या निवडणुकांमुळे सरकार विधेयक आणणार नाही. तर दुसरीकडे, विधेयक आणले जाईल आणि गोंधळ झाल्यास ते प्रलंबित ठेवले जाईल किंवा पुन्हा विचारासाठी समितीकडे पाठविले जाईल, असे काही नेत्यांना वाटत आहे. महत्त्वाचा मुद्दा  सा की, वक्फ विधेयक सभागृहात सादर झाले तर बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार नेमकी कोणती भूमिका घेतात? याकडे सर्वांचे लक्ष लागून राहणार आहे. शिवाय, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांचा पक्ष कोणती भूमिका घेतो हेही बघावे लागणार आहे. जेडीयू आणि तेलुगू देसम पक्षाच्या मदतीशिवाय सरकारला कोणतेही विधेयक लोकसभेत पारीत करून घेता येणार नाही ही वास्तविकता आहे. २०२६ च्या मे महिन्याच्या आधी बिहार, पश्चिम बंगाल, तमिळनाडू, आसाम आणि पुद्दुचेरी या पाच राज्यांत विधानसभेची निवडणूक होणार आहे. या सर्व राज्यांमध्ये अल्पसंख्याक मतदारांची संख्या बऱ्यापैकी आहे. अशात, सरकार नेमका कोणता डाव खेळणार याकडे लक्ष लागून आहे. तिकडे, गृहमंत्री अमित शहा यांनी २०२५ आणि २०२६ या दोन वर्षांत होणाऱ्या विधानसभांच्या निवडणुकीची व्यूहरचना तयार  केली आहे. बिहारची निवडणूक कशी जिंकायची याचा मास्टर प्लान तयार आहे.

# सकल मूर्खांचा दिवस!

### (१एप्रिलः जागतिक एप्रिल फुल डे विशेष.)

**या दिवशी लोक एकमेकांसोबत विनोद, मस्ती करतात, चेष्टा करतात. आजकाल लोक सोशल मीडियाच्या मदतीने या दिवसाचा खूप आनंद घेतात. मित्र, नातेवाईकांना 'एप्रिल फुल्स डे'वर मजेदार मीम्स, जोक्स आणि शायरी पाठवतात. मात्र आपण एप्रिल फुल्स डे साजरा करण्यामागचं कारण माहिती करून घेण्यासाठी श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर संकलित लेख जरूर वाचा...**

एप्रिल फूल दिन हा एप्रिल महिन्याचा पहिला दिवस होय. या दिवशी गमतीने एखाद्यास मूर्ख बनविण्याची प्रथा पाश्चिमात्य राष्ट्रांत प्रामुख्याने दिसून येते. मूर्ख बनलेल्या व्यक्तीस एप्रिल फूल म्हणण्याचा प्रघात आहे. या प्रथेची सुरुवात केव्हा व कशी झाली हे निश्चितपणे सांगता येत नाही. तथापि काही लोक तिचा संबंध प्राचीन रोममधील व्हीनस व फॉर्चुना व्हिरिलीस या देवतांच्या उत्सवाशी लावतात. ग्रेगोरियन पंचांग १५६४ साली स्वीकारल्यानंतर फ्रान्समध्ये या प्रथेस सुरुवात झाली व ती १६०० पर्यंत इतरत्र पसरली असेही म्हटले जाते. काही लोक त्यास लूच्या वसंतोत्सवाची स्मृती मानतात. प्राचीन रोममधील हिलेरिया व भारतातील होळी या उत्संवाशी या एप्रिल फूलचे बरेच साम्य आहे. होळी व हिलेरिया यांच्याप्रमाणेच हा प्रकार वसंतागमनाच्या वेळीच साजरा करतात. मेक्सिकोत २८ डिसेंबरला हा दिवस पाळतात. त्या दिवशी उसनी घेतलेली वस्तू परत न करण्याची तेथे प्रथा आहे. मूर्ख बनलेल्या व्यक्तीस इंग्लंडमध्ये एप्रिल फूल, स्कॉटलंडमध्ये एप्रिल गॉक व फ्रान्समध्ये एप्रिल फिश म्हणतात. ब्रिटिशांच्या अंमलाबरोबर ही प्रथा भारतात आली. या दिवसास सकल मूर्खांचा दिवस असेही म्हणतात.

हा दिवस अनेक देशांमध्ये १ एप्रिलला साजरा केला जातो. या दिवशी मित्रांच्या खोड्या काढल्या जातात किंवा त्याच्यावर विनोद केले जातात. याचा एकमात्र उद्देश त्यांना ओशाळवणे हाच असतो. एप्रिल फूल साजरा करण्याची सुरूवात फ्रान्समधून झाली असे म्हटले जाते. पॉप ग्रेगरी १३ यांनी १५८२ साली प्रत्येक युरोपियन देशाला ज्यूलियन कॅलेंडर सोडून ग्रेगोरियन कॅलेंडर वापरण्याचे निर्देश दिले. ग्रेगोरियन कॅलेंडरमध्ये नवे वर्षे हे १ एप्रिलपासून नाही तर १ जानेवारीपासून सुरू होतं. अनेक लोकांनी हे मानण्यास नकार दिला तर काहींना याबद्दल माहितीही नव्हती.



– संकलन व शब्दांकन –
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

यामुळे ते नववर्ष १ एप्रिललाच साजरे करतात. अशांना एप्रिल फूल म्हटले जाऊ लागले. यादिवशी प्रँक करून एकमेकांना मुर्ख बनवू लागले. बघता बघता ही प्रथा युरोपमध्ये पसरली. या दिवशी लोक एकमेकांसोबत विनोद, मस्ती करतात, चेष्टा करतात. मूर्ख कोण असतो? इतरांना मूर्ख बनवितो, खरेतर तोच खरा मूर्ख असतो. आजकाल लोक सोशल मीडियाच्या मदतीने या दिवसाचा खूप आनंद घेतात. मित्र, नातेवाईकांना 'एप्रिल फुल्स डे' वर मजेदार मीम्स, जोक्स आणि शायरी पाठवतात. मात्र तुम्हाला एप्रिल फुल्स डे साजरा करण्यामागचं कारण माहिती आहे का? एप्रिल फुल डे साजरा करण्यामागे दोन कथा प्रचलित आहेत. एप्रिल फुल डे मागची पहिली प्रचलित कथा-

इंग्लंडचा राजा रिचर्ड द्वितीय आणि बोहेमियाची राणी अॅनी यांनी ३२ मार्च १३८१ रोजी त्यांच्या लग्नाची घोषणा केली. लग्नाच्या बातमीने जनतेमध्ये आनंदाचे वातावरण होते. मात्र, कॅलेंडरमध्ये ३२ मार्च ही तारीख नसते. राजा-राणीने लग्नाची खोटी माहिती देऊन लोकांना मूर्ख बनवले होते, तेव्हापासून हा दिवस साजरा करण्यास सुरुवात झाली. ३२ मार्च हा दिवस नाही म्हणून १ एप्रिल हा दिवस एप्रिल फूल डे म्हणून साजरा करण्यात आला.

यामागची दुसरी कथा अशी आहे की, फ्रान्समध्ये १५८२ मध्ये पोप चार्ल्स यांनी जुन्या कॅलेंडरच्या जागी नवीन रोमन कॅलेंडर सुरू केले. मात्र, त्यानंतरही काही लोक जुन्या तारखेनुसार नवीन वर्ष साजरे करत होते. त्यामुळे जुन्या कॅलेंडरनुसार नवीन वर्ष साजरे करणाऱ्यांना एप्रिल फूल म्हटले गेले. तेव्हापासून १ एप्रिल हा दिवस एप्रिल फूल डे म्हणून साजरा करण्यात आल्याचं सांगितलं जातं. एखाद्याचा वेळ, पैसा आणि बुद्धी व्यर्थ खर्ची पाडून वेड्यात काढणे, हे शहाण्यांना शोभते का? विचारमंथन अवश्यच व्हावे.

!! कुणालाही मूर्ख बनविणे कदापिही योग्य नाही, एखाद्याच्या नजरेतून आपण कधीही उतरून नये !!

# आधुनिक शालिवाहन : डॉ. केशव बळीराम हेडगेवार

## 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व'चा सिद्धांत

हिंदूंनी संघटित होणे हाच हिंदू-मुस्लीम ऐक्याच्या प्रश्नावरील एकमात्र तोडगा आहे, या निष्कर्षावर ते पोहोचले होते. तरुणांवर राष्ट्रीय संस्कार करणारे आणि गुणवत्तेवर भर देणारे कार्य करण्याची कल्पना त्यांचे मनात बळावत चालली होती. या सर्वांची परिणती म्हणजे 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व' हा स्वयंसिद्ध सिद्धांत घेऊन १९२५मध्ये विजयादशमीला डॉक्टरांनी त्यांच्या सहवासातील दहा-पंधरा तरुणांना 'आज आपण संघ सुरू करीत आहोत'असे सांगून संघाची सुरुवात केली. त्याचे सर्व पैलू सहकाऱ्यांशी संवाद, चर्चा करून आणि सर्वांच्या सहमतीने व अनौपचारिक पद्धतीने, हिंदूंच्या सांस्कृतिक परंपरेच्या प्रकाशात, कुटुंब पद्धतीच्या अंगाने ते विकसित करीत गेले. त्यात त्यांच्या विलक्षण प्रतिभेची झेप स्पष्ट पाहावयास मिळते. एक बीज जमिनीत गाडून घेऊन नष्ट होते. पण शेकडो बीजे असलेल्या फळांनी तो वृक्ष कालांतराने डवरतो. तितक्याच सहजतेने, संयमाने डॉक्टरांनी संघाची उभारणी केली. संघ प्रारंभापासून या देशातील सर्वानांच राष्ट्रीयदृष्ट्या हिंदूच मानतो. रुढार्थाने हिंदू समाजाच्या संघटनेस प्रारंभ केलेल्या संघाने १९८०च्या सुमारास भारतातील सर्वांनाच शाखेत प्रवेश दिला. त्यासाठी आपल्या तत्त्व व कार्यपद्धतीत कोणताही बदल केला नाही. परिणामी आता हळूहळू संघाच्या कार्यकर्त्यात अभारतीय संप्रदायांचाही सहभाग होऊ लागला आहे. आपल्या संघटनेचा गुरू म्हणून कोणाही व्यक्तीस मान्यता न देता तो मान भगव्या ध्वजास संघाने दिला आहे. ध्वजाला साक्षी ठेऊनच स्वयंसेवकांना हिंदू धर्म, हिंदू संस्कृती आणि हिंदू समाज यांचे संरक्षण या उद्दिष्टांचा स्पष्ट उल्लेख असलेली प्रतिज्ञा संघात संस्कार रूपाने दिली जाते.

सहस्रावधी वर्षांच्या भारताच्या इतिहासात सांस्कृतिकदृष्ट्या या दिवसाचे माहात्म्य खूप मोठे आहे. अशा वर्षप्रतिपदेला, दि. १ एप्रिल १८८९ला एका सामान्य वैदिक घराण्यात डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार यांचा जन्म झाला. डॉक्टरांनी आपल्या सर्वस्व समर्पणातून पसायदानातील भाव जगभर प्रस्थापित करू शकणारा भारत उभा करण्यासाठी खूप दूरदृष्टीने रा. स्व. संघाच्या रूपाने जे कार्य उभे केले ते नीट जाणून घेणारी कोणतीही व्यक्ती, डॉक्टरांचे निधन झाले आहे हे मान्य करणार नाही. कारण आजही देश-विदेशात सहस्रावधी स्वयंसेवकांच्या जीवनातून त्याला डॉक्टर हेडगेवार यांचीच कमी-अधिक गुणात्मकतेची प्रतिबिंबे पाहावयास मिळत आहेत. असे भाग्य क्वचितच काही महापुरुषांना लाभते. डॉ. हेडगेवार यांना जन्मजात एकच वरदान लाभले होते ते म्हणजे ज्वलंत राष्ट्रभक्तीचे. व्हिक्टोरिया राणीच्या राजवटीला ६० वर्षे झाली म्हणून शाळेत मिठाई वाटण्यात आली असता, आठ वर्षांच्या केशवाने ङ्गतिची मिठाई खाण्यात आनंद कसला?ङ्घ म्हणून ती कचरापेटीत फेकून दिली होती. १२ व्या वर्षी सातवे एडवर्ड यांच्या राज्यारोहणाच्या दिवशीही त्याने शासकीय आनंदोत्सवात भाग घेतला नाही. पुढे रिस्ले सर्क्युलरने तरुणांनी 'राष्ट्रीय चळवळीत भाग घेऊ नये' असा आदेश दिलेला असताना आणि 'वंदे मातरम्' घोषणेवर बंदी असताना नागपूरच्या नील सिटी हायस्कूलमध्ये शाळा तपासणीस आला असता 'वंदे मातरम्' हा जयघोष वर्गा-वर्गांतून घडविण्यात केशवचाच पुढाकार होता. पण यामागे कोण होते? हे दोन महिने शाळा बंद होऊनही कोणास समजले नाही. असे संघटन कौशल्य त्याने त्या वयातच सिद्ध करून दाखविले आणि जे केले ते योग्यच केले, या आग्रहामुळे पुढे त्याला शाळेतून काढून टाकण्यात आले. पुढे केशवने डॉक्टर मुंजे यांच्या पाठिंब्याने कोलकात्यातील नॅशनल मेडिकल कॉलेजमध्ये १९१० साली प्रवेश घेतला. आपलेच काही देशबांधव स्वार्थासाठी फितुरी करून त्यांना पकडून देत व सामान्य जनता होणाऱ्या परिणामास घाबरून लांबच राहीले. स्वराज्य प्राप्तीच्या दृष्टीने ही एक मोठी कमतरता त्यांना आढळली. त्यामुळे लोकांत विशुद्ध राष्ट्रभक्तीची भावना स्थायी स्वरूपात जागृत करणे, त्यांच्यात अनुशासनबद्धता, नि:स्वार्थ वृत्ती जागविणे आणि राष्ट्रासाठी कणशः व क्षणशः झिजण्याची भावना निर्माण करणे खूप आवश्यक आहे, अशा निश्चयाकडे त्यांचे मन झुकू लागले होते.



नागपुरात आल्यावर आपले काका आबाजी हेडगेवार यांना त्यांनी पत्रोत्तरातच कळवून टाकले होते, ङ्गजन्मभर अविवाहित राहून राष्ट्र कार्य करण्याचा मी निश्चय केला आहे.ङ्घ

पुढील पाच-सात वर्षांत अनेक मार्ग त्यांनी चाचपून पाहिले. काँग्रेसच्या कार्यात पदाधिकारी म्हणून अनेक वर्षे त्यांनी पूर्ण झोकून कार्यही केले. 'नागपूर नॅशनल युनियन' ही जहाल विचारांची संस्था त्यांनी चालविली होती. राष्ट्रीय उत्सव मंडळ, भारत स्वयंसेवक मंडळ, अनाथ विद्यार्थी गृह अशा विविध मार्गाने ते प्रयत्न करीत होते. १९१९ मध्ये काँग्रेसने हिंदू-मुस्लीम ऐक्यासाठी खिलाफत आंदोलनास पाठिंबा दिला. याचा स्वराज्याशी काहीही संबंध नव्हता. डॉक्टरांनी आपले मतभेद स्पष्टपणे काँग्रेस पदाधिकाऱ्यांसमोर नोंदविले होते. तथापि ते काँग्रेसपासून लगेच दूर झाले नाहीत. त्यांना मुसलमानांचे अनुनय हे राजकारण नुकसान करणारे वाटे. हिंदू-मुस्लीम ऐक्याविना स्वराज्य मिळणार नाही या विचाराला त्यांचा मुळातूनच विरोध होता. असहकार आंदोलनात त्यांनी स्वतःला पूर्णपणे झोकून दिले. बंदी हुकूम झुगारून लावल्यामुळे आणि चिथावणीखोर भाषणे केल्यामुळे त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला दाखल झाला. त्यांना एक वर्षांची शिक्षा झाली. खटला झाल्यास बचाव करावयाचा नाही हा असहकार आंदोलनाचा एक नियम डॉक्टरांनी सपशेल झुगारून लावला. स्वतःच उलट तपासणीही करून पोलिसांची त्यांनी भंबेरी उडविली. त्यांचे बचावाचे भाषण ऐकून इंग्रज न्यायाधीशाने, ङ्गमूळ भाषणापेक्षा त्यांचे हे समर्थन अधिक राजद्रोहपूर्ण आहे,ङ्घ असे उद्गार काढले.

मूलगामीस्वरूपाचे चिंतन

डॉक्टरांना या दीड तपाच्या कालखंडाने जीवनकार्याच्या वास्तविक चिंतनासच प्रवृत्त केले. आंदोलने होतात, पण त्यांचा जोम टिकून का राहत नाही? भली भली म्हणविणारी माणसेही स्वार्थी, दुटप्पी प्रवृत्तीची आणि उद्घोषित ध्येयवादाशी प्रतारणा करणारी का असतात? अनुशासनहीनतेचे प्रदर्शन आपल्या सार्वजनिक जीवनात एवढे ढळढळीतपणे का होते? मूठभर इंग्रज या देशावर सुखाने राज्य करूच कसे शकतात? आपल्या समाजाची अवनती झाली व गुलामी त्यांच्या नशिबी आली ती केवळ आक्रमकांच्या श्रेष्ठत्वामुळेच काय? भारत इंग्रजांच्या जोखडातून मुक्त झाला तरी त्याचे स्वातंत्र्य टिकून राहील याची शाश्वती काय? हिंदू-मुस्लीम एकतेचा ध्यास घेणे तसेच एका प्राचीन समाजाने उद्दाम अल्पसंख्याकांपुढे शरणागती पत्करणे हे राष्ट्रीय आंदोलनाला कितीसे पोषक आहे? इत्यादी अनेक प्रकारचे वादळ डॉक्टरांच्या अंतरंगात उठले होते. इतिहासाच्या व अनुभवाच्या प्रकाशात राष्ट्रीय प्रवृत्तीची चिकित्सा करण्यात त्यांचे मन गुंतले होते.

एखादा निष्णात धन्वंतरी अवघड व जुनाट दुखण्याच्या मुळाशी जातो त्याप्रमाणे डॉक्टरांनी जो विचार चालविला होता तो मूलगामी स्वरूपाचा होता. रोगनिदान व त्यावरील मात्रा ते शोधत होते.

गुरुपूजनाचे दिवशी आपापल्या शक्तीनुसार भगव्या ध्वजापुढे धन समर्पण करण्याची पद्धती संघाने सुरू केली, त्यातून संघ आपल्या आर्थिक गरजा भागवितो. ध्वज पूजन हेच प्रमुख. धन समर्पण गौण असाच संस्कार संघात दिला जातो. 'आपण सारे हिंदू' एवढ्याच आधाराने संघ हिंदू संघटन करतो, त्यामुळे प्रारंभापासूनच येथे जातीभेदाच्या भावना आढळत नाहीत. संघ केवळ हिंदू संघटनाचे कार्य करतो व संस्कारित स्वयंसेवक अनेक संघटनाद्वारे अनेक समस्यांचे निराकरण करीत आहेत. तथापि त्यांच्या संघटना पूर्ण स्वायत्त आहेत. राजकीय माध्यमातून हिंदू संघटनेचे कार्य होऊच शकणार नाही म्हणून संघ दैनंदिन राजकारणापासून पूर्णतः अलिप्त आहे. पण संघातले स्वयंसेवक त्यांच्या इच्छेनुसार संघकार्यास बाधक होणार नाही, अशा प्रकारे कोणतेही कार्य करू शकतात. तथापि कोणत्याही राजकीय पक्षाचा पदाधिकारी संघात पदाधिकारी असू शकत नाही. राष्ट्राची सेवा करण्यासाठी स्वयंप्रेरणेनेच पुढे आलेले लोक अशी डॉ. हेडगेवार यांनी संघाची व्याख्या केली आहे. 'स्वयंसेवक'या शब्दाला आपल्या गुणात्मकतेमुळे संघाने एक विशेष आशय प्राप्त करून दिला आहे. जो समाजानेही अनुभविला आहे. हे संघाच्या कार्यपद्धतीतूनच घडले आहे.

**– जयंत रानडे**

## सावधान! घिबलीच्या नादात संकटात सापडाल

मुंबई : सोशल मीडियाचे (Social Media) जाळे जगभरात पसरत असून विविध ॲपचे लोकांना वेड लागत आहे. सोशल मीडियावर सुरु असणाऱ्या प्रत्येक गोष्टींकडे माणूस सहज ओढला जातो. विविध फोटो आणि व्हिडिओच्या चलत्या ट्रेंडमध्ये आता 'घिबली' नावाच्या वादळाने तुफान घातले आहे. गेल्या काही दिवसांत चॅट जीपीटीद्वारे तयार केले जाणाऱ्या घिबली आर्ट माणसांच्या फोटोला कार्टूनचे रुप दिले जात आहे. अगदी लहानग्यांपासून वयोवृद्ध तसेच सर्व अभिनेते आणि राजकारणातील लोकं देखील या ट्रेंडचा वापर करत आहेत. अनेकजण स्वतःचे, मित्र-मैत्रिणींचे, कुटुंबाचे फोटो वापरून आकर्षक इमेजेस तयार करत आहेत आणि सोशल मीडियावर शेअर करत आहेत. इतकेच नव्हे तर त्या फोटोंवर लाईक्स आणि कमेंट्सचा मोठा वर्षाव देखील होत आहे. पण या मनोरंजनाच्या मागे एक मोठा धोका लपलेला आहे का? तुमचा फोटो एआयसोबत (AI) शेअर करणे म्हणजे नकळत तुमची ओळख धोक्यात घालण्यासारखे आहे का? असे अनेक प्रश्न नागरिकांच्या मनाला भेडसावत आहेत. त्यामुळे घिबलीचा धोका आहे का, जाणून घ्या.

घिबली किंवा इतर कोणतीही एआय इमेज तयार करण्यासाठी आपल्याला आपला फोटो एआय प्रणालीसोबत शेअर करावा लागतो. आपण नकळतपणे आपली अत्यंत वैयक्तिक बायोमेट्रिक माहिती म्हणजेच आपल्या चेहऱ्याची ओळख एआय कंपन्यांना देत असतो. ही गोष्ट पासवर्ड किंवा क्रेडिट कार्ड नंबर चोरीला जाण्यापेक्षाही जास्त धोकादायक मानली जाते. एकदा का तुमच्या चेहऱ्याचा डेटा चोरीला गेला किंवा त्याचा गैरवापर झाला, तर त्याचे परिणाम गंभीर असू शकतात.

चेहऱ्याची ओळख पटवणाऱ्या तंत्रज्ञानाची बाजारपेठ वेगाने वाढत आहे. स्टॅटिस्टाच्या अहवालानुसार, २०२५ मध्ये ही बाजारपेठ ५.७३ अब्ज डॉलर्सची असेल आणि २०२१ पर्यंत ती १४.५५ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे (16.79% CAGR>). मेटा (Meta) आणि गूगल सारख्या मोठ्या कंपन्यांवरही युजर्सच्या फोटोंचा वापर त्यांच्या एआय मॉडेल्सना प्रशिक्षित करण्यासाठी केल्याचे आरोप झाले आहेत. पिमआईज (PimEyes) सारख्या वेबसाइट्समुळे तर कोणीही फक्त फोटो वापरून एखाद्या व्यक्तीला ऑनलाइन शोधू शकते, ज्यामुळे ओळख चोरीचा धोका आणखी वाढतो.

हे धोके टाळण्यासाठी सावधगिरी बाळगणे हा एकमेव मार्ग आहे. कोणत्याही एआय टूलचा वापर करण्यापूर्वी विचार करा की तुमचा फोटो किंवा डेटा कसा वापरला जाईल. सोशल मीडियावर कमी रिझोल्यूशनचे फोटो अपलोड करा. शक्य असल्यास फेस अनलॉकऐवजी पिन किंवा पासवर्ड वापरा.

Ghibli AI आर्टचे धोके कोणते?

गोपनीयतेचा भंग : युजर्सचे फोटो त्यांच्या परवानगीशिवाय विविध कारणांसाठी वापरले जाऊ शकतात.

ओळख चोरी : फोटोंचा गैरवापर करून एखाद्याची ओळख चोरली जाऊ शकते.

डेटा सिक्युरिटी : युजर्सची माहिती सुरक्षित राहू शकत नाही आणि हॅकिंगला बळी पडू शकते.

चुकीचा वापर : फोटोंचा चुकीचा वापर केला जाऊ शकतो, जसे की फेक प्रोफाइल तयार करणे.

कायदेशीर मुद्दे : युजर्सच्या फोटोंचा अनधिकृत वापर कायदेशीर समस्या निर्माण करू शकतो. ही जोखीम लक्षात घेऊन युजर्सनी आपले फोटो शेअर करण्यापूर्वी सावधगिरी बाळगली पाहिजे.

# खुलताबाद येथे ईदगाह मैदानावर रमजान ईद ईद-उल-फित्र उत्साहात साजरी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद शहर व परिसरात सोमवारी आज रमजान ईद ईद-उल-फित्र उत्साहात साजरी केली गेली रमजान ईद निमित्त खुलताबाद येथील ईदगाह मैदानावर हजारो मुस्लिम बांधवांनी सामूहिक नमाज पठण केले. सकाळी साडे साडेआठ च्या सुमारास हाफिज मोहम्मद याह्या यांनी नमाज पठण केले.

तसेच खुलताबाद शहरातील दर्गा हजरत ख्वाजा शेख बहानोद्दीन गरीब रह. येथे देखील रमजान ईद ची सकाळी नऊ वाजता नमाज हाफिज सय्यद युसुफ यांनी नमाज पठण केले. यानं तर सर्वांनी एकमेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

विशेष म्हणजे या दरम्यान कोणतेही अनुचित प्रकार घडू नये म्हणून खबरदारी घेत ग्रामीण पोलिस अधीक्षक विनय कुमार राठोड, उपविभागीय पोलिस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड. पोलिस निरीक्षक धनंजय फराटे यांच्या मार्गदर्शनाखाली ईदगाह परिसरात चौख पोलीस बंदोबस्त लावण्यात आले होते राज्य राखीव दल पथक.व स्थानिक पोलीस कर्मचारी यांच्या सह मोठा पोलीस फोर्स तैनात करण्यात आले होते.

शीरखुर्मा चवीला तर उत्तम असतोच पण आरोग्यासाठी ही खूप फायदेशीर ठरतो. त्यामुळे त्याचा आस्वाद नक्की घ्या. आमदार प्रशांत बंब यंदा गुढीपाडवा आणि रमजान ईद हे दोन्ही मोठे सण अगदी लागोपाठ आले आहेत. त्यामुळे सगळीकडेच आनंदाचे, उत्साहाचे वातावरण आहे. कोणताही सण म्हटला की त्याचा एक पारंपरिक पदार्थ ठरलेला असतो. जसं की गुढीपाडव्याच्या दिवशी श्रीखंड- पुरीला महत्त्व आहे तर रम



जान ईदच्या दिवशी शीरखुर्म्याशिवाय रमजान ईद नाहीच.. त्यामुळे खवय्यांना दोन दिवस दोन उत्तम पदार्थांची मेजवानी मिळाले आहे असे आमदार प्रशांत बंब यांनी या ईद मिलन कार्यक्रम प्रसंगी बोलताना सांगितले

ईद-उल-फित्र रमजान ईदचा उत्साह खुलताबाद शहरात नमाज पाठण मुस्लिम बांधवांची पहाटे पासून ईदगाह मैदानावर गर्दी झाली होती.रमजान ईद च्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर शिरखुर्मा वाटपाचा कार्यक्रम झाला.

**खुलताबादकरांनी सौहार्द राखले -विनय कुमार राठोड ईद मिलन कार्यक्रम त सहभाग**

खुलताबाद करांनी आपली शांततेची परंपरा कायम राखत सोमवारी ईद उल फित्रचा रमजान ईद या सण उत्साहात साजरा केला. विविध जाती-धर्मांतील नागरिकांनी एकत्र येऊन सौहार्दाचे दर्शन घडवले. या आनंदमय वातावरणात ईद मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये पोलिस अधीक्षक डॉ.विनय कुमार राठोड यांनी विशेष उपस्थिती लावली. माजी नगराध्यक्ष ॲड. कैसरोद्दीन आणि दर्गा कमिटी हद्दे खुर्दचे अध्यक्ष शरफोद्दीन मोहम्मद रमजानी यांनी पोलीस अधीक्षक यांना रमजान ईद ची निमित्ताने निमंत्रण केले होते यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.त्यांनी नागरिकांशी संवाद साधत ईदच्या शुभेच्छा दिल्या.

ईदगाहमध्ये सकाळी मुस्लिम बांधवांनी सामूहिक नमाज अदा केली आणि देशाच्या शांतता आणि समृद्धीसाठी प्रार्थना केली. त्यानंतर नागरिकांनी एकमेकांना ईदच्या शुभेच्छा देत आपुलकीचा संदेश दिला.ईद मिलन कार्यक्रमात पोलिस अधीक्षक डॉ. विनय कुमार राठोड, उप विभागीय पोलिस अधिकारी विजय कुमार ठाकुरवाड, तहसीलदार स्वरूप कंकाळ, आमदार प्रशांत बंब यांच्यासह विविध समाजातील मान्यवर उपस्थित होते. नागरिकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.माजी नगराध्यक्ष एड. कैसरोद्दीन यांनी ईद मिलन कार्यक्रमात बोलताना सांगितले की, देशभरात औरंगजेबाची कबरी वाद देशभरात चर्चा सुरू असली तरी खुलताबाद करांनी नेहमीच हिंदू-मुस्लिम ऐक्याचे उदाहरण घडवले आहे. जातीवादी विचारांना फाटा देत येथील नागरिक सौहार्दाने सण साजरे करतात.प्रशासनाने या हिंदू मुस्लिम एकोपीचे आदर्श शासना पर्यंत पोहोचवावा आणि इतरांनी ही याचा प्रेरणादायी आदर्श घ्यावा, अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त केली.

या प्रसंगी ग्रामीण पोलीस अधीक्षक राठोड यांनी सांगितले, 'खुलताबादच्या नागरिकांनी शांततेची आणि बंधुत्वाची परंपरा कायम राखली आहे. जाती-धर्माच्या भिंती ओलांडून त्यांनी एकोप्याचा संदेश दिला आहे, यासाठी मी सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. नागरिकांच्या संयम आणि सामंजस्यामुळे संपूर्ण सण शांततेत पार पडला.सदर कार्यक्रमाने सर्व समाज बांधवांनी सामाजिक ऐक्याचा संदेश दिला असून, खुलताबादकरांनी पुन्हा एकदा सौहार्दाचे दर्शन घडवले आहे.

यावेळी आमदार प्रशांत बंब, पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक धनंजय फराटे,शिवसेना उबाठाचे नेते कृष्णा पाटिल डोणगावकर, कांग्रेसचे जिल्हा सरचिटणीस किरण पाटिल डोणगावकर,भद्रा मारुती देवस्थानचे अध्यक्ष मिठु पाटील बारगळ,माजी उपनगराध्यक्ष नवनाथ बारगळ, भाजपा शहराध्यक्ष परसराम बारगळ,माजी नगरसेवक योगेश बारगळ माजी उपनगराध्यक्ष सुरेश मरकड, मुनीबोद्दीन, निसार अहेमद, विलास चव्हाण, शाजेब अहेमद, एजाज अहेमद रईस जागीरदार मोहम्मद नईम बक्ष सलेह मोहम्मद, अनवरोद्दीन, फकीर मोहम्मद कुरैशी यांच्यासह खुलताबाद शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राला ७ कोटी ८४ लाखाचा निधी वितरणास मान्यता

**हिंगोली** - वसमत येथील मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या अंमलबजावणीसाठी सन २०२४-२५ करिता आज ७ कोटी ८४ लक्ष ८० हजार रुपयांचा निधी आज वितरीत करण्यास मान्यता दिल्याने जिल्ह्यातील हळद संशोधनाला गती प्राप्त होणार आहे. परिणामी येथील हळद उत्पादक शेतक-यांना याचा मोठा लाभ होणार आहे. जिल्ह्यामध्ये 'मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र' कंपनी कायद्याच्या कलम ८ नुसार ना-नफा तत्त्वावर एक स्वायत्त संस्था म्हणून स्थापन करण्यास दि. १४ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या शासन निणर्यान्वये मंजुरी देण्यात आली आहे. या केंद्रामध्ये काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन अदा करण्यासाठी दि. ३० जुलै, २०२४ व ९ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या शासन निणर्यान्वये निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच, दि. १६ सप्टेंबर, २००२४ व दि. २३ जानेवारी, २०२५ रोजीच्या शासन निर्णयांन्वये योजनेसाठी सन २०२४-२५ करीता निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच आता या योजनेकरिता आज गुरुवार, दि. २७ मार्च, २०२५ च्या शासन निर्णयानुसार शासनाने मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राकरीता सन २०२४-२५ मध्ये २४०१४४४६ या लेखाशीर्षाखाली ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) उद्दिष्टांखाली रु. १८४.२० लाख व ३५-भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान या उद्दिष्टांखाली रु. ६००.६० लाख असा एकूण रु. ७८४.८० लाख (रुपये सात कोटी चौऱ्याऐंशी लाख ऐंशी हजार फक्त) निधी आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध करून देण्यास मान्यता दिली आहे. हा निधी पीक संवर्धन, फलोत्पादन व भाजीपाला पिके, मसाला पिके, मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद), संशोधन व प्रशिक्षण, कार्यक्रम लेखाशीर्षांतर्गत चालू वर्षी अर्थसंकल्पित केलेल्या तरतूदीतून खर्च करण्यात येणार आहे.

## श्री. क्षेत्र पंचाळेश्वर येथे शनि अमावस्या उत्साहात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पंचाळेश्वर येथील दिगंबर जैन समाजाचे श्री १००८ नंदिश्वर दिगंबर जैन अतिशय क्षेत्र आहे भारत भर प्रसिध्द आहे. गोदावरी काठेवर असलेले हे क्षेत्र अत्यंत दिव्य असून येर्णाया भाविकांचे आकर्षण ठरत आहे. हा सोहळा आचार्य गुप्तीनंदी गुरुदेव व मयंकसागर महाराज यांच्या आशीर्वादाने शनि अमावस्या निमीत्त भगवंताचा महामस्तकाभ्षिोक सोहळा आयोजीत करण्यात आला होता. शनि अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता भगवान मुनिसुव्रतनथा भगवंताचा महामस्तकाभिषेक सोहळा हा जल, दुध, दही, सर्व औषधी, आर्म्ररस, चिकु रस, अनार रस आदी रसांनी भगवंताचा पंचामृत केला. यावेळी भगंताचे इंद्र इंद्राणी बनण्याचे सौभाग्य क्षेत्राचे अध्यक्ष मदनाबाई गौतमचंद काला यांना मिळाला तर शांतीधारेचा मान आशा संजय रणदिवे परिवार यांना मिळाला. यावेळी भगवंताची विविध अष्टद्रव्यांनी पुजा अभिषेक करण्यात आला. तसेच भगवताच्या महाअरतीने कार्यकमाची सांगता करण्यात आली. यावेळी कोषाध्यक्ष संजय सेठी, वृषभ गंगवाल, विशाल काला, राजु काला, सुभाष बडजाते, दिलीप कासलीवाल, पंकज काला, भगवानदास काला, वर्धमान ठोले, शांतीनाथ ढोले, संजय रणदिवे, पुजा काला, ब्रम्हेश काला, वैशाली सेठी, सैलस बडजाते, सुनील गोथा महेन्द्र पाडे, विजय सोनतोष पहाडे, राजेन्द्र कासलीवाल वन्दन काला शोभाबाई सेठी, मनोरमा पाटणी अजित सेठी, सुरज अन्नदाते यांच्यासह छत्रपती संभाजीनगर, पाचोड, आडुळ, बीड, धर्माबाद तामसा कळब गेवराई आदी ठिकाणाहुन भक्तगण उपस्थित होते.

यावेळी उपस्थित भाविकांना लिलाबाई, वनमाला, सतिश, पुजा, स्वप्नील, कोमल, शुभम, रणदिवे परिवार गुळजवाला यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात आला. यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष गौतम काला ऊपाध्यक्ष ऋशब गंगवाल सूहास चूडीवाल सचिव भाऊसाहेब बाकलीवाल कोषाध्यक्ष संजय सेठी सहसचिव विजय पापडीवाल कैलास खोबरे विश्वस्त प्रकाश सेठी संदीप कासलीवाल, विलास पहाडे भगवानदास काला अशोक कासलीवाल राजेद्र काला संतोष अजमेरा हिरालाल धोदलकर, कार्यकारणी अध्यक्ष सुनिल पाटणी यांनी परिक्षम घेतले. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा पियूष कासलीवाल यानी दिली .

# भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सवनिमित्त राजाबाजार जैन मंदिरात ५१ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सकल जैन समाज छत्रपती संभाजीनगर अंतर्गत भ.महावीर जन्मत्सोव समिती तर्फे १० एप्रिल रोजी भ.महावीर जन्मोत्सव मोठया उत्साहाने साजरी करण्यात येणार आहे. भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव समिती खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार, गुरू परिवार, पुलक मंच यांच्या संयुक्त विद्यमाने मंदिरात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराचे उदघाटन सकल जैन समाजाचे अध्यक्ष राजेंद्रबाबुजी दर्डा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पंचायत अध्यक्ष एवं सकल जैन समाज महासचिव महावीर पाटणी, पंचायत सचिव प्रकाश अजमेरा, महावीर जन्मकल्याणक महोत्सव समितीचे अध्यक्ष स्वप्नील पारख,प्रशांत देसरडा व प्रकल्प प्रमुख मनोज छाबडा, सी.ए.निखील गंगवाल, नरेंद्र अजमेरा समीर ठोले, सुनिल पाटनी कार्याध्यक्ष प्रतिक साहुजी, संगीता



संचेती, महासचिव निलेश जैन, सारीका साहुजी, कोषाध्यक्ष बाहुबली वायकोस,ललीता साकला,मिना पापडीवाल, कार्यकम संयोजक पंकज साकला, डिंपल पगारीया,मनिषा भंसाली, सचिव प्रमोद पाटणी , सहसचिव मंजु पाटणी, अनिता पहाडे, वैशाली धोगडे, विश्वस्त महावीर ठोले,अरुण पाटनी ,नीता ठोले , चंदा कासलीवाल ,रवि मुगदिया, शैलेश रावका, संजय पापड़ीवाल, नरेंद्र अजमेरा, विलास साहुजी, निलेश सेठी, उपस्थित होते.

यावेळी सकल जैन समाजाचे अध्यक्ष राजेंर्द्रबाबुंजी दर्डा यांनी रक्तदाना विषयी आपले विचार मांडले व रक्तदान हे सर्व श्रेष्ठ दान आहे. रक्तदाना बददल जनजागृती करा, रक्तदान हे महादान आहे. असेही सांगीतले. यावेळी पंचायत तर्फे राजेंद्रबाबुजी दर्डा व लक्ष्मीनारायण बाखरीया यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच यांवेळी रक्तदात्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

हे रक्तदान शिबीर जन्म कल्याणकाचे औचित्य साधुन करण्यात आले होते. व सामाजिक उपकम राबवुन हे शिबीर घेण्यात आले होते. या शिबीरामध्ये ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

यावेळी कार्यकमाचे प्रास्ताविक पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी यांनी केले. यावेळी संतोष पापडीवाल, प्रिया छाबडा, दिपीका बडजाते, अमित पाटणी, विवेक धरमसी, अभिजीत काला, अनुज दगडा, वृषभ कासलीवाल, विनोद बोकडिया, अनिलमामा संचेती, प्रमोद छाबडा, मनिषा पाटणी, संगीता सेठी, भारती बागरेचा, कविता अजमेरा, रमेश पाटणी, शैलेश चांदीवाल, सागर पाटणी यांच्यासह समाज बांधव व महिलांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

रक्तदान शिबिरासाठी लायंस ब्लूड बैंक चे डॉ प्रकाश पाटनी ,अमृता ब्लड चे डॉ सुभाष पाटोदी विशाल जेन यांचे सहकार्य लाभले. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

## भगवान महावीर जन्मकल्याणनिमित्त राजाबाजार महिला मंडळाच्या प्रश्नमंच स्पर्धेस महिलांचा लक्षणीय सहभाग



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भगवान महावीर जन्मकल्याण समितीच्या अंतर्गत खंडेलवाल दिगंबर जैन मंदिर राजा बाजार महिला मंडळातर्फे सोमवारी दुपारी घेण्यात आलेल्या प्रश्नमंज स्पर्धेत महिलांनी सहभागी होत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी अध्यक्ष स्वप्निल पारख निलेश जैन पंकज साखला प्रमोद पाटणी भारती बागरेच्या संगीता संचेती सविता लोढा भावना सेठिया, मंगल पारख, कविता अजमेरा, मेघा सुगंधी, सविता लोढा, ललिता साकला, तनुजा गांधी,मनीषा पाटणी, सारिका साहुजी, मनीषा भन्साळी, मधु जैन, मीना पापडीवाल, मंजू पाटणी, आशा कासलीवाल,साधना शहा,अनिता लोहाडे सुरेखा पाटनी सगीता सेठी , पल्लवी शहा आदींच्या उपस्थितीत प्रश्नपत्रिका चे विमोचन झाले.

भगवान महावीर तसेच सामान्यज्ञान विषयी प्रश्न विचारले होते प्रारंभी प्रकाश अजमेरा प्रमोद पाटणी अध्यक्षा सुरेखा पाटणी संगीता सेठी प्रकल्प संयोजक अलका पहाडे, पुष्पलता कासलीवाल, संगीता गंगवाल, ज्योती कासलीवाल आदींनी मान्यवरांचे स्वागत केले. प्रारंभी सुनीता गंगवाल यांनी मंगलाचरण म्हटले स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी चंदा कासलीवाल सुनिता कासलीवाल अनिला ठोळे, संगीता कासलीवाल शोभा ठोळे, सीमा पाटणी, सुनंदा कासलीवाल आदींनी परिश्रम घेतले अशी माहिती स्पर्धा प्रसिद्धी प्रमुख प्रशांत शहा तसेच पियुष कासलीवाल, नरेंद्र अजमेरा यांनी दिली.

## शेकडो भक्तांनी नवकार मंत्राचा जप केला नवकार फाऊंडेशनतर्फे दसो दिशा महामंत्र नवकार जपानुष्ठान प्रारंभ

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सकल जैन समाजाच्या वतीने भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सवाच्या २५ व्या वर्षानिमित्त एका भव्य 'दसो दिशा महामंत्र नवकार जपानुष्ठान' चे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सोमवार, ३१ मार्च २०२५ रोजी सकाळी ७:०० ते दुपारी १२:१५ या वेळेत महावीर भवन येथे पार पडला.

परम पूज्य आचार्य अभयदेव सुरीश्वरजी म.सा. आणि परम पूज्य साध्वी सिद्धि सुधाजी म.सा. यांच्या विशेष आशीर्वादाने तसेच प. पु. साध्वीजी अमित सुधाजी यांच्या सान्निध्यात विधिवत कलश स्थापनेसह, नवकार फाऊंडेशनने विश्व कल्याणासाठी या 'पाचव्या अखंड महामंगलकारी नवकार महामंत्र' चा संगीतमय जप दहा दिशांमध्ये आयोजित केला होता. या प्रसंगी संगीतरत्न संजय संचेती आणि संगीतकार आशीषकुमार बोथरा जैन यांनी संगीतमय नवकार मंत्र सादर करून वातावरण भक्तिमय केले.

जैनम महिला मंचाच्या नेतृत्वाखाली सकल जैन समाज महिला मंडळाने या कार्यक्रमाचे संचालन केले.

भगवान महावीर यांच्या जन्म कल्याणकाच्या २५ व्या वर्षानिमित्त आयोजित हा जपानुष्ठान जैन समुदायासाठी एक महत्त्वाचा उत्सव ठरला.

हा कार्यक्रम केवळ धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचा नाही, तर समुदायाला एकत्र आणून शांतता आणि सौहार्द वृद्धिंगत करण्याची संधीही प्रदान करतो.

या प्रसंगी शेकडो भक्तांनी नवकार मंत्राचा जप केला. जैन धर्मातील सर्वात पवित्र मंत्रांपैकी एक असलेला हा मंत्र शांतता, सौहार्द आणि आध्यात्मिक उन्नतीचे प्रतीक मानला जातो. संगीतमय जपाने या कार्यक्रमाला अधिक आध्यात्मिक आणि मनमोहक बनवले.




कार्यक्रमात श्रावक संघाचे अध्यक्ष झुबंरलाल पगारीया, महावीर भवनचे अध्यक्ष मिठालाल कांकरीया, भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव समितीचे अध्यक्ष स्वप्नील पारख, कार्याध्यक्ष प्रतीक साहुजी, निलेश जैन, बाहुबली वायकोस, पंकज सांखला, प्रमोद पाटणी, नवकार फाऊंडेशनचे प्रकल्प प्रमुख व सकल जैन समाजाचे उपाध्यक्ष रवि मुगदीया, अनिलकुमार संचेती, विलास साहुजी, विनोद बोकडीया, राजेश मुथा, अजित जैन, संतोष पांपडीवाल, अभिजित हीरप, प्रकाश कोचेटा यांच्यासह महिला सांस्कृतिक समिती व जैनम महिला समितीच्या भारती बागरेचा, मंगला पारख, संगीता संचेती, मनीषा भंसाली, भावना सेठीया, कविता अजमेरा, मीना पापडीवाल आदी उपस्थित होत्या.

महासती पूज्य श्री अमितसुधाजी म सा यांनी मागील ५ वर्षापासुन नवकार फाऊंडेशन च्या नवकार जाप या वेळेस मोठी उपलब्धि लाभेल असा शुभाशिर्वाद दिला.

या उपक्रमात सकल जैन सम ाजातील सर्व व्यक्ती आणि संस्थांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन नवकार फाऊंडेशनने केले आहे. आपण जिथे असाल तिथे जवळच्या संलग्न संस्थेम ध्ये किमान ४५ मिनिटांचा नवकार जप आयोजित करावा, अशी विनंतीही त्यांनी केली आहे.

## माजी सैनिक आणि वन विभागाच्या माजी महिला कर्मचाऱ्यांसाठी भरती

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

१३६ च्या इन्फंट्री टेरिटोरियल आर्मी पर्यावरण, महार बटालियन मध्ये २१ ते २३ एप्रिल २०२५ या कालावधीत एसआरपीएफ कॅम्प ग्राऊंड धुळे शहर, धुळे येथे माजी सैनिक व वन विभागाच्या माजी महिला कर्मचाऱ्याम्साठी भरती प्रक्रिया आयोजित करण्यात आली आहे. पात्र उमेदवारांनी शारीरिक निकष आणि वैद्यकीय तपासणीसाठी सर्व कागदपत्रांसह दि.२१ एप्रिल रोजी पहाटे साडेपाच वा. भरतीच्या ठिकाणी उपस्थित रहावे,असे आवाहन लेफ्ट. प्रभु अमित सी. यांनी केले आहे.

या भरतीप्रक्रियेत शिपाई जनरल ड्युटी पद –४४ फक्त महाराष्ट्रातील माजी सैनिक आणि केंद्र सरकार पर्यावरण मंत्रालय, आणि वन विभाग, महाराष्ट्र सरकार निवृत्त महिला कर्मचारी यांच्या साठी; कारकून पद – ६, आचारी पद – १, नाभीक पद – १, मसालची पद – १, वेटर पद – १, लोहार पद – १,

पात्रता : माजी सैनिक आणि सेवानिवृत्त महिला(वन व पर्यावरण विभाग) वयोमर्यादा ५० वर्षापेक्षा जास्त नसावी. माजी सैनिक (केवळ पेन्श्नधारक) साठी किमान वयोमर्यादा नाही परंतु सेवानिवृत्ती नंतर ५ झाली नसावीत. पर्यावरण मंत्रालय, केंद्र सरकार आणि वन विभाग, महाराष्ट्र सरकाराच्या माजी महिला कर्मचाऱ्यांच्या स्वेच्छानिवृत्तीसाठी किमान वयोमर्यादा नाही, परंतु सेवानिवृत्ती नंतर ५ वर्षापेक्षा जास्त नसावीत.

वर्ग:– डिस्चार्ज पुस्तकानंतर (अनुकरणीय / खूप चांगले) (एशाश्रिरी़ / तशी़ ऋेव)

पात्रता:– माजी सैनिक (केवळ पेन्शनधारक) आणि माजी माजी महिला कर्मचारी पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय आणि राज्य वन विभाग (स्वेच्छेने सेवानिवृत्त) केंद्र सरकार आणि राज्य सरकार (वन विभाग) मध्ये २० वर्षांच्या सेवेसह

शारिरीक चाचणी :– (केवळ पुरुषांसाठी):– १ मैल धावणे शर्यंत ७ मि निटे ९ सेंकदात पूर्ण करता आली पाहिजे. ९ फूट खड्डा – ९ फूट खड्डा उडी मारुन पार करता आला पाहिजे. बिम – नियम ानूसारसंतुलन बिम चालत जावे लागेल.

महिलांच्या भरती प्रक्रियेत मुलाखत भर्ती अधिकारी मंडळाद्वारे घेतली जाईल. रोपवाटिकेत वृक्षारोपण आणि रोपे तयार करण्याची कार्यक्षमता,वैद्यकीय तपासणी

आवश्यक कागदपत्रे :–पेन्शन पेमेंट ऑर्डर (झझज),डिस्चार्ज बुक / एडच ओळखपत्र,पासपोर्ट आकाराचा फोटो ०८, शिक्षण प्रमाणपत्र,अधिवास प्रमाणपत्र / आधार कार्ड

निवडलेल्या उमेदवाराची वैद्यकीय तपासणी केली जाईल. शारीरिक आणि वैद्यकीय चाचणी उत्तीर्ण झालेल्या उम ेदवारांची बोर्ड अधिकाऱ्यांकडून मुलाखत घेतली जाईल.

अट :– भरती प्रक्रिया पूर्णपणी गुणवत्तेवर आणि रिक्त : पदावर आधारीत असेल. प्रादेशिक आर्मी पर्यावरण महार बटालियनमध्ये कोणत्याही प्रकाराच्या पेन्शनाचा प्रस्ताव नाही.भारतीय लष्कर आणि प्रादेशिक सैन्यातील माजी सैनिक आणि पर्यावरण, विभाग केंद्र सरकार आणि महाराष्ट्र राज्य वन विभागाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पूर्वीचे पेन्शन मिळत राहील.सुरुवातीला फक्त दोन वर्षासाठी भरती केली जाईल, नंतर जवानाच्या कामाच्या आणि शिस्तीच्या मूल्यमापनाच्या आधारावर, त्यानंतरच्या प्रत्येक वर्षी प्रादेशिक सैन्याच्या नियम ांनुसार नोकरी एक वर्षासाठी वाढविली जाईल.

रॅलीमध्ये कोणत्याही प्रकारच्या अपघात, घटनेची जबाबदारी भरती मंडळ घेणार नाही.या मोफत भरती सेवा आहेत. यामध्ये भरतीसाठी कोणालाही लाच देऊ नका.मध्यस्थांपासून दूर राहा. जर उमेदवार लाच देताना पकडला गेला तर त्याची निवड रद्द केली जाईल. कोणत्याही छेडछाड केलेल्या किंवा ओव्हरराईट केलेल्या कागदपत्रांचा भरतीसाठी विचार केला जाणार नाही. चुकीची कागदपत्रे आणि चुकीची माहिती दिल्यास कायद्यानुसार शिक्षा किंवा नोकरीतून बडतर्फ केले जाईल. रॅलीच्या ठिकाणी मोबाईल फोन वापरण्यास मनाई आहे. कोणत्याही अधिक माहितीसाठी किंवा चौकशीसाठी कृपया खालील क्रम ांकावर संपर्क साधवा. मोबाईल क्रमांक ९१६८१६८१३६

## संजय राऊतांकडून मोदींच्या 'वारसदारा'च्या चर्चेनंतर निवृत्तीवर भाष्य

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (३० मार्च) नागपूरच्या रेशीमबाग येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्मृती मंदिराला भेट दिली होती. त्यानंतर संघ मुख्यालयात वरिष्ठ नेत्यांशी बातचीत केली. मोदींच्या या नागपूर भेटीनंतर शिवसेना (ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी नरेंद्र मोदी यांच्या राजकीय वारसादाराबद्दल भाष्य केलं होतं. मोदींचा राजकीय वारसदार महाराष्ट्रातील असेल असं राऊत यांनी म्हटलं होतं. पाठोपाठ राऊत यांनी आज (१ एप्रिल) पंतप्रधान मोदींच्या राजकारणातील निवृत्तीबाबत भाष्य केलं आहे.

संजय राऊत म्हणाले, ७५ वर्षांनंतर राजकीय निवृत्तीचा नियम स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच केला आहे. त्यांच्या पक्षातील नेत्याचं वय ७५ वर्षे झाल्यानंतर त्याने सत्तेच्या पदावर राहू नये असा मोदींचा नियम आहे. ज्येष्ठ नेते लालकृष्ण आडवाणी, मुरली मनोहर जोशी यांच्यासह अनेक नेत्यांना हा नियम लागू केला होता. मोदी आता या नियमापलिकडे आहेत का? मोदींनी जेव्हा हा नियम केला होता तेव्हा त्याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची देखील मान्यता होती. मोदी येत्या १७ सप्टेंबर रोजी ७५ वर्षांचे होत आहेत. त्यामुळे त्यांच्या नियम ाबाबत, निवृत्तीबाबत चर्चा करण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने मोदींना आमंत्रित केलं होतं. शिवसेनेचे (ठाकरे) खासदार म्हणाले, ङ्गबाप जिवंत असताना वारसदार ठरवला जात नाही, ती मोगली संस्कृती आहे, अशी कितीही वक्तव्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली तरी त्यांना बोलू द्या. मात्र, मोदींच्याच नियमानुसार त्यांना राजकारणातून निवृत्त व्हावं लागतंय. अवतारकार्य संपलं की सर्वांनाच जावं लागतं. राम, कृष्ण आले आणि त्यांचं अवतारकार्य संपल्यावर निघून गेले. आता मोदींचं अवतारकार्य संपलंय, त्यांनाही निघून जावं लागेल.

**आडवाणींना बेदखल करून मोदी पंतप्रधान झाले होते : संजय राऊत**

संजय राऊत म्हणाले, फडणवीस सांगतायत की बाप जिवंत असताना वारसदार ठरवला जात नाही, ती मोगली संस्कृती आहे वगैरे, वगैरेः मात्र, औरंगजेबाने शहाजहानला कोंडून ठेवलं होतं, त्याचप्रमाणो मोदींनी लालकृष्ण आडवाणी यांना कोंडून ठेवलं, बेदखल केलं आणि स्वतः पंतप्रधान झाले. मुळात लालकृष्ण अडवाणी यांनी भारतीय जनता पार्टीचा डोलारा उभा केला आहे. भारतीय जनता पार्टीला दोन खासदारांपासून सत्तेच्या शिखरापर्यंत नेण्याचं काम लालकृष्ण अडवाणी यांच्यासारख्या लोकांनीच केलं आहे. आडवाणी यांनी अयोध्येचं आंदोलन केलं होतं.

## वक्फ संशोधन विधेयक लोकसभेत सादर होण्याची शक्यता

### अर्थसंकल्पीय अधिवेशन संपण्यापूर्वी होणार सादर

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

वक्फ संशोधन विधेयक संदर्भात मोठी माहिती समोर आली आहे. केंद्र सरकार बुधवारी लोकसभेत वक्फ संशोधन विधेयक सादर करणार आहे. भाजपाने एनडीएच्या सहयोगी पक्षांना याची माहिती दिली आहे. सरकारच्या वरिष्ठ मंत्र्यांनी सहयोगी पक्षांच्या नेत्यांना फोन करून त्यांना माहिती दिली असून, समर्थन मागितल्याची माहिती सूत्रांनी दिली.

संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन ४ एप्रिलला संपुष्टात येणार आहे. यापुढे, या विधेयकाला कायदा बनवण्यासाठी संसदेच्या दोन्ही सदनांत (लोकसभा आणि राज्यसभा) पास करणे आवश्यक आहे. या विधेयकावर अल्पसंख्यक व संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी आज, सोमवारी सांगितले की विधेयक सादर करण्याची वेळ संसदेच्या बैठकीनंतर ठरवली जाईल. हे विधेयक लवकरात लवकर पारित व्हावे अशी इच्छा आहे. केंद्र सरकारने संकेत दिला की उद्या,मंगळवारी विविध पक्षांच्या नेत्यांशी विधेयक सादर करण्याच्या वेळेवर चर्चा केली जाईल. त्यानंतर बुधवारी ते लोकसभेत सादर होऊ शकते.

या बिलाच्या अनुषंगाने किरेन रिजिजू म्हणाले की, काही पक्ष आणि संघटना मुस्लिम समाजाची दिशाभूल करीत आहेत. विधेयकासंदर्भात हे लोक खोटे सांगत आहेत. हे विधेयक मुसलमानांच्या हितासाठी आहे. ईदेच्या वेळी मुसलमानांना काळ्या पट्ट्या बांधून विधेयकाचा विरोध करण्याचे आवाहन करण्यात आले. लोकांना रस्त्यावर उतरण्यास प्रवृत्त करणे हे योग्य नाही. अल्पसंख्यक व संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी नागरिकता (संशोधन) कायद्याविरोधात देखील असेच मोहीम सुरू करण्यात आल्याचे सांगितले. त्यांनी प्रश्न केला, या कायद्याच्या आल्यानंतर एकही मुसलमान नागरिकता गमावला आहे का? विरोधी पक्षांना आग्रह केला आहे की ते विधेयक चांगले वाचून मग सरकारशी संवाद साधा असे आवाहन त्यांनी केले.

## उपजिल्हाधिकारी देवेंद्र कटके यांना जीवे मारण्याचा कट; पत्नीने मित्राच्या सहाय्याने जादूटोणा केल्याचाही आरोप

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्ह्याचे उपजिल्हाधिकारी देवेंद्र कटके यांना जीवे मारण्याचा कट रचल्याचे समोर आल्यानंतर प्रशासकीय वतुर्ळात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, याप्रकरणी त्यांनी स्वतः च्या पत्नी सारिका आणि तिच्या मित्राविरोधात फिर्याद दिली आहे. या गुन्ह्यात सहा जण सहभागी असून, पोलिसांनी त्यांच्याविरोधात अॅट्रॉसिटी, जीवे मारण्याचा प्रयत्न आणि जादूटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. तिघांना पोलिसांनी अटक केली आहे.

देवेंद्र आणि सारिका यांचा २००० मध्ये आंतरजातीय प्रेमविवाह झाला होता. मात्र, गेल्या काही वर्षांपासून त्यांच्यात कौटुंबिक वाद सुरू होता. कटके यांनी काही दिवसांपूर्वीच आपली संपत्ती मुलांच्या नावे केल्याची चर्चा महसूल विभागात आहे. कौटुंबिक वादानंतर सारिका माहेरी गेली असताना तिचा मोबाइल घरी विसरला. त्यातून कटके यांना संशयास्पद रेकॉर्डिंग आणि स्क्रीनशॉट मिळाले. तसेच, जीपीएस लोकेशननुसार सारिका वडीगोद्री येथील एका हॉटेलजवळ तिघांबरोबर बराच वेळ थांबली होती. देवेंद्र कटके यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता ती तिथे तीन अनोळखी व्यक्तींसोबत असल्याचे निदर्शनास आले. विनोद उबाळे नावाचा संशयित अघोरी विद्येचा उपासक असल्याचे मोबाइलमधील रेकॉर्डिंगमधून समोर आले आहे. त्यानुसार कटके यांनी घराची तपासणी केल्यावर

२०१५ मध्ये लक्ष्मीपूजनाच्या रात्री सारिका उशिरापर्यंत मोबाइलवर चॅट करताना दिसली. ती झोपल्यानंतर कटके यांनी तिचा मोबाइल तपासला असता काही संशयास्पद गोष्टी आढळल्या. त्यांनी हा प्रकार तिच्या आई–वडिलांना सांगितला. त्यांनी सारिकाची चूक कबूल करून माफी मागितली होती. त्यामुळे मुलांच्या भविष्याचा विचार करून कटके शांत बसले होते.

२०१३ मध्ये सारिकाने जातिवाचक अपशब्द वापरून देवेंद्र कटके यांचा अपमान केला होता. ङ्गमला आरक्षणाचा लाभ मिळावा म्हणूनच मी तुझ्याशी लग्न केले.

नाहीतर तुझ्यासारख्या खालच्या जातीच्या व्यक्तीशी लग्न केले नसते, असे तिने सांगितले होते. त्यानंतरही तिचे वागणे अधिकाधिक तिरस्कारी होत गेले. या संपूर्ण प्रकरणानंतर पोलिसांनी तपास सुरू केला आहे. कटके यांनी दिलेल्या पुराव्यांनुसार आरोपींवर कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**